# भारती विद्यापीठ मध्यवर्ती कार्यालय, पुणे

जा.क्र. : भा.वि./म.का./१२७२०/२०२०-२०२१ दिनांक : 30/१२/२०२०

## परिपत्रक

प्रति,
शाखाप्रमुख,
भारती विद्यापीठ व
भारती विद्यापीठ विश्वविद्यालय

विषय :- माननीय साहेबांची जयंती साजरी करणेबाबत.

भारती विद्यापीठाचे संस्थापक, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती आणि महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री डॉ. पतंगराव कदमसाहेब यांची ८ जानेवारी २०२१ रोजी ७७ वी जयंती आहे. त्यांची ही जयंती आपण सर्वांनी खालीलप्रमाणे साजरी करावयाची आहे.

★ दि. ०८ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेमध्ये सर्व शाखा/विभागांचे प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी आपापल्या शाखेत माननीय साहेबांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करावे व त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करावी.

★ त्यानंतर त्याच दिवशी सकाळी ९ ते १० या वेळेमध्ये पुणे (एरंडवणे, धनकवडी, लवळे शैक्षणिक परिसर), नवी मुंबई, नवी दिल्ली, जव्हार, सोलापूर, कराड, सांगली, कोल्हापूर येथील शाखाप्रमुख व इतर सर्वांनी आपापल्या शैक्षणिक संकुलामध्ये एकत्रितरीत्या माननीय साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली समर्पित करावयाची आहे.

★ **मा.साहेबांच्या जयंतीच्या औचित्याने भारती विद्यापीठ व भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वतीने गुरुवार दिनांक ७ जानेवारी २०२१ रोजी दुपारी ४.00 वाजता ज्येष्ठ पत्रकार व खासदार मा. कुमार केतकर यांचे व्याख्यान भारती विद्यापीठाच्या यु ट्यूब चॅनेलच्या https://www.youtube.com/user/bharatividyapeethuni या लिंकवरुन थेट प्रसारित होणार आहे. त्यांच्या या व्याख्यानाचा लाभ आपण, आपल्या शाखेतील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांना होईल या दृष्टीने विशेष सूचनापत्राव्दारे त्यांना सूचित करावे.**

..२

Mr. Pathan to email to all teaching & non-teaching faculty.

[signature] 04/01/2021

★ तसेच **दिनांक ८ जानेवारी २०२१ रोजी** संस्थेने विविध शैक्षणिक संकुलात मा. साहेबांच्या जीवनावर आधारित तज्ज्ञ मान्यवरांच्या व्याख्यानाचे खालीलप्रमाणे आयोजन केले आहे.

| **शैक्षणिक संकुल** | **वेळ** | **वक्ते** | **स्थळ** |
|---|---|---|---|
| नवी मुंबई | सकाळी ११ वा. | मा. प्रसन्न जोशी, वृत्तसंपादक ए.बी.पी. माझा | भा.वि.अभियांत्रिकी महाविद्यालय सभागृह, नवी मुंबई |
| कोल्हापूर | सकाळी ११ वा. | मा. वसंतराव भोसले, संपादक, दै. लोकमत, कोल्हापूर | भारती विद्यापीठ शैक्षणिक परिसर, मोरेवाडी, कोल्हापूर |
| पुणे ( धनकवडी व एरंडवणे ) | दुपारी ३.३० वा. | मा.श्रीपाल सबनीस पूर्वाध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन | भा.वि. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यामंदिर प्रांगण, धनकवडी, पुणे ४३. |
| सांगली | दुपारी ३.३० वा | मा. राजन गवस, ज्येष्ठ साहित्यिक | भारती विद्यापीठ विश्वविद्यालय मेडिकल कॉलेज, सांगली. |

या व्याख्यानास आपापल्या शैक्षणिक परिसरातील सर्व शाखा / विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित असतील या दृष्टीने तेथील सर्व शाखाप्रमुखांनी विशेष दक्षता घ्यावी.

**( प्रा. डॉ. के. डी. जाधव )**
सहकार्यवाह(प्रशासन)
भारती विद्यापीठ, पुणे.

प्रत माहितीसाठी :-

१) मा. कार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे यांचे स्वीय सहाय्यक
२) मा. कुलपती, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय यांचे स्वीय सहाय्यक
३) मा. कार्याध्यक्ष, भारती विद्यापीठ, पुणे यांचे स्वीय सहाय्यक.
४) मा. कुलगुरु, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे.
५) मा. अध्यक्षा, शालेय समिती, भारती विद्यापीठ , पुणे.
६) मा. सहकार्यवाह (अकौंटस्), भारती विद्यापीठ, पुणे
७) मा. सहकार्यवाह (इस्टेट), भारती विद्यापीठ, पुणे.
८) मा. कुलसचिव, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे.